# निवडणुक प्रचार अभियान डायरी- दि.21.04.2014

**अरुण जेटली**

(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

**जगदीश टायटलर यांचा कॅप्टन द्वारे बचाव- द डेविल्स एडवोकेट**

1984 चे वर्ष नेहमी खराब आठवणींचे वर्ष म्हणून लक्षात ठेवले जाईल. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर निर्दोष शीखांचे हत्याकांड भारतीय लोकशाहीवर कलंक आहे. ज्यात हजारो निर्दोष मारले गेले ती हकीकत भयानक आहे. सर्वोत खरी बाब ही आहे की त्यात दोषींना शिक्षा मिळाली नाही.

राज्यातील मिलीभगत दिसत होती. दंगेखोरांवर पोलिसांकडून सुद्धा गोळ्या झाडल्या जात नव्हत्या. त्यांना लूटपाट आणि मारपीट साठी रान मोकळे करण्यात आले होते. त्या वर्षी अनेक एफआयआर नोंदविण्यात आली होती, पण कोणाची धरपकड करण्यात आली नव्हती. हा हिंसाचार राजकीय हेतूने प्रेरित होता.

पंतप्रधान श्री राजीव गांधी आणि त्यांच्या कॉग्रेस सरकारद्वारे नियुक्त न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा आयोगाने या हिंसाचाराला झाकले. ज्याच्या बदल्यात त्यांच्या निवृत्तीनंतर कॉग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचे राज्यसभेत नामांकन करण्यात आले. मात्र एनडीए सरकारने सत्य बाहेर आणण्यासाठी न्यायमूर्ती नानावटी आयोगाची नेमणूक केली होती. त्यामुळे तपास एजन्सीने केलेल्या तपासामुळे दंगलीत शामील अनेक आरोपींविरोधात खटला चालवण्यात आला.

सत्य शोधण्यासाठी ती एक न्यायिक प्रक्रिया होती. कॅप्टन अमरिंदर सिंह कशासाठी “ सैतानाचे वकील” बनले आणि जगदीश टायटलर यांना क्लीन चीट देण्याचे नक्की केले? काय ते अशा व्यक्तीला वाचवण्यासाठी मागत होते जी व्यक्ती कथित दंगलीत गुंतली असल्याचे समजते? काय कॅप्टन यांना यासमोर व्यक्तीगत आणि राजकीय संबंध अधिक प्रिय वाटतात?

**आणखी एक बेफाम निवेदन**

कॅप्टन भोपाल गॅस पिडीतांविरोधात “डाऊ जोन्स” च्या बाजूने युक्तीवाद केल्याचा आरोप माझ्यावर करत आहेत. डाऊ जोन्सचे युनियन कार्बाईड अथवा भोपाल गॅस दुर्घटनेशी काही देणेघेणे नाही. ती एक अग्रणीची अमेरिकन फायनान्शियल कंपनी आहे. डाऊ जोन्सने आकस्मिक रित्या वॉल स्ट्रीट जर्नलची मालकी घेतली. भोपाळ गॅस पिडीतांविरोधात लढणा-या वकीलाचे नाव आहे अभिषेक मनु सिंघवी जे कॅप्टन अमरिंदर सिंह यांच्या राजकीय पक्षाचे मुख्य प्रवक्ते आहेत. मी माझे व्यावसायिक साथी म्हणून त्यांना हजारो परिणामग्रस्त लोकांसाठी केस लढण्याचा सल्ला दिला होता. जर लोक किंवा एखादी कंपनी त्या ट्रॅजेडी मध्ये गुंतलेली नसेल तर त्यांना माझा सल्ला देणे मी योग्य समजतो, हे माझे व्यावसायिक तत्त्व आहेत, ज्यांना वकील म्हणून योग्य सल्ला देणे माझे कर्तव्य आहे.

**भारताच्या संवेदनशील विस्ताराची सुरक्षा**

निवडणुक प्रचार अभियानासाठी देशाच्या प्रत्येक भागात राहणा-या शेकडो माजी सैनिकांची मदत घेण्यात आली. त्यांनी बिकट परिस्थितीत देशाची सेवा केली आहे. त्यांनी देशभक्तीसाठी ही सेवा दिली आणि त्यांचा हेतू नागरिकांचे रक्षण करण्याचे आहे. हे सर्व माजी सैनिक खुप वर्षांपासून “एक रँक एक पेंशन” ची मागणी करित आहेत.

भाजपने आपल्या निवडणुक जाहिरनाम्यात “एक रँक एक पेंशन” चा मुद्दा समाविष्ट केलाच आहे. आम्ही त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रतिबद्ध आहोत. कॉग्रेसने वारंवार या मुद्द्यावर माजी सैनिकांची गळचेपी केली आहे. काही वर्षांआधी अर्थमंत्र्यांनी स्वीकारले होते, त्यांनी अर्थसंकल्पीय भाषणा दरम्यान या बाबीचा उल्लेख केला होता. त्यानंतर, आपण पाहिले की, त्याची अंमलबजावणी झाली नाही. सर्व माजी सैनिकांसाठी आदर दर्शवण्याचा हेतू त्यामागे होता. या वर्षी पुन्हा अर्थसंकल्पीय भाषणात, अर्थमंत्र्यांनी या मागणीचा स्वीकार करण्याचा उल्लेख केला. मात्र पुन्हा माजी सैनिकांना दिलेल्या वचनाचे पालन करण्यात आले नाही. ही बाब चिंतेची आहे आणि भारताच्या संरक्षण क्षेत्रात सुसज्जतेचा अभाव दिसून येतो.

आपल्या संरक्षण दलाने इतक्या वर्षात खुप काही सहन केले आहे. संरक्षण खरेदीसाठी निर्णय घेणारे संरक्षण मंत्री श्री ए.के.एंटनी यांची निष्फळता यासाठी मुख्यतत्त्वे करुन जबाबदार आहे. आज भारताच्या संरक्षण क्षेत्राच्या वास्तविकतेत अनेक फेरफार करण्यात झाले आहेत. पाकिस्तान-चीनने लष्करी सहयोगासाठी हात मिळवणी केली. भारताच्या संरक्षण साधनांत आधुनिकीकरणाचा अभाव आहे. अप्रचलित टेक्नॉलॉजी अत्याधुनिक टेक्नॉलॉजीने बदलून टाकायला हवी. 15000 कि.मी. आंतरराष्ट्रीय सीमेवर कोणताही देश अप्रचलित टेक्नॉलॉजी वर आधारित नाही. भारतीय सबमरीन बाबत नुकतीच झालेली करुणांतिका याबाबतचे उदाहरण आहे. चीन त्यांच्या सीमेजवळील पायाभुत

सुविधांना मजबूत करित आहे तर आपण मात्र त्याकडे दुर्लक्ष करित आहोत. भाजप संरक्षण सुसज्जतेच्या बाबत “राष्ट्र प्रथम” सिद्धांताला प्रतिबद्ध आहे.